# कृषी क्षेत्रामध्ये सामाजिक माध्यमांचा वापर ठरतोय महत्त्वपूर्ण

डॉ. अश्विनी मुखेकर
सहाय्यक प्राध्यापिका (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)
डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे

प्रा. अभिजीत पवार
सहाय्यक प्राध्यापक (कृषी विस्तार शिक्षण विभाग)
कै. राजाराम मराठे कृषी महाविद्यालय, फोंडाघाट

कृषी क्षेत्रात सामाजिक माध्यमांचे कार्य व महत्त्व कृषी क्षेत्रात आलेल्या नवीन तंत्रज्ञानामुळे मागील काही दशकांत कृषी उत्पादनामध्ये क्रांती झाली आहे. त्याचप्रमाणे आज संज्ञापनाच्या नवीन पद्धती उपलब्ध झाल्यामुळे कृषी क्षेत्राची माहिती मिळवणे व त्यावर आपले मत मांडणे शक्य झाले आहे. आतापर्यंत संभाषण किंवा संवाद करण्यासाठी लोकांना समोरासमोर असणे आवश्यक होते.

आज सामाजिक माध्यमांच्या वापरातून एखादी व्यक्ती किंवा शेतकरी त्याचे खाजगी किंवा शेती निगडित संभाषण दुसऱ्या शेतकऱ्यांबरोबर समोरासमोर हजर न राहता जगाच्या कोणत्याही भागातून करू शकतो. आज फेसबुक, ट्विटर, यू ट्यूब, ब्लॉग, इत्यादी सामाजिक माध्यमांच्या वापरामुळे हे शक्य झाले आहे. आज शेतकऱ्यांना एकमेकांशी जोडण्यासाठी आणि शेतीविषयक माहिती इतरांना करून देण्यासाठी सामाजिक माध्यमांच्या वापर संज्ञापन प्रक्रियेसाठी अत्यावश्यक झाला आहे. यामार्फत शेतकरी आपले नवे तंत्र, नवे विचार इतर शेतकऱ्यांपर्यंत प्रसारित करू शकतात. सामाजिक माध्यमे ही सामाजिक जीवनातील महत्त्वाचे संपर्क साधन बनले आहे.

आज परदेशातील शेतकरी सामाजिक माध्यमांचा उपयोग करून आहारतज्ज्ञ, राजकारणी आणि ग्राहकांना आपल्या शेतीबद्दल माहिती देतात. शेतकऱ्यांचा गट जगातील कोणत्याही शेतकऱ्यांच्या गटाशी संपर्क साधतात व त्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या शेतीबद्दल चर्चा करतात. आज तरुण शेतकरी वर्ग सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने शेतीत यश प्राप्त करताना दिसतात. काही शेतकरी सामाजिक माध्यमांच्या वापर करणार नाहीत तर काही शेतकरी सुरुवातीला इतर शेतकऱ्यांशी व शास्त्रज्ञाशी झालेल्या ओळखीचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करतील. सामाजिक माध्यम हे शेतकऱ्यांसाठी जास्त उत्पादन व जास्त नफा मिळवून देणारे साधन ठरू शकेल.

आपल्या देशाच्या लोकसंख्येप्रमाणे कृषी क्षेत्रातसुद्धा वैविध्य आढळते. बांधावरील शेतीव्यतिरिक्त शेतकऱ्यांनी नवनवीन संसाधनांचा विकास करणे महत्त्वाचे ठरेल. शेतकऱ्यांची नवी पिढी शेतीव्यतिरिक्त इतर उद्योगांवर जगण्याचा प्रयत्न करीत आहे. नवी पिढी शेतीशी निगडित असलेल्या उद्योगधंद्यांना जवळ करीत आहे. कृषि आधारित उद्योगाबद्दलची ते प्रत्यक्ष भेटून प्रदान करू शकत नाहीत, यासाठी सामाजिक माध्यमांचा वापर करून ग्राहकांशी वैयक्तिक संपर्क करीत आहेत.

शेतकऱ्यांनी संपर्क साधनाचा जास्तीत जास्त वापर करून शेतीशी निगडित बाबींवर चर्चा करून त्याचा प्रचार करणे आवश्यक आहे. सामाजिक माध्यमांच्या वापरामुळे कृषिव्यवसाय विकसित होऊन सामान्य लोकांमध्ये लोकप्रिय होतील. सामाजिक माध्यमाचा वापर करण्यासाठी कारखानदारांना किंवा व्यावसायिकांना सामाजिक माध्यमाची जाण असलेला तज्ज्ञ त्यांच्या हाताशी ठेवावा लागेल.

सामाजिक माध्यम हे सर्वसामान्यांशी जोडलेले तंत्रज्ञान आहे. सामाजिक संबंध जोडण्याचे, माहितीच्या देवाणघेवाणीचे आणि वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या लोकाना जवळ आणणारे प्रभावी साधन आहे. फेसबुक, ट्विटर आणि यू ट्यूब यांसारख्या सामाजिक माध्यमांमार्फत विविध गटांमध्ये आपल्या तंत्रज्ञानाची (माहिती) देवाणघेवार करता येते. अनोळखी लोकांजवळ आपल्या मनातील गोष्टीची देवाणघेवाण करता येते. या माध्यमाच्या वापराने एक नवीन श्रोतावर्ग तयार होतो. ट्विटर, फेसबुक, व्हॉट्सॲप लिंक्डइन, ॲग्रोपीडिया, यू ट्यूब इत्यादींमार्फत शेतकऱ्यांना त्यांचे विचार खुलेपणार मांडण्याचे साधने उपलब्ध आहे. फेसबुक आणि ट्विटर वापरणारे शेतकरी इतरांपेक्षा लोकप्रियतेमध्ये सरस ठरतात.

शेतकरी सामाजिक माध्यमावर त्यांना आवश्यक वाटणारी महत्त्वपूर्ण माहिती तथा कृषी क्षेत्रातील आवश्यक गोष्टीचे आदानप्रदान करू शकतात. सामाजिक माध्यमे ही जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहेत. त्यात आवडीची माहिती ट्विटर, व्हॉट्सॲप ॲग्रोपीडिया, फेसबुक, इत्यादी माध्यमांवर जास्तीत जास्त वाचली जाते व हजारो लोकांपर्यंत पोहचते.

कृषिक्षेत्र व सामाजिक माध्यमे ही एकमेकांना पूरक आहेत. सामाजिक माध्यमे ही लोकांनी खिळून ठेवणारे मंच आहे. सामाजिक माध्यम हे शेतकऱ्यांना व ग्रामीण उद्योगांसाठी महत्त्वपूर्ण संज्ञापनाचे माध्यम आहे. सामाजिक माध्यमांतून शेतकऱ्यांना स्वतःचे मंच उपलब्ध झाले आहेत. शेतकरी नवनवीन तंत्रज्ञान, शेतीपूरक व्यवसाय यांविषयीचे त्यांचे अनुभव एकमेकांशी देवाणघेवाण करू शकतात. शासनाच्या विविध योजना, धोरणे यांविषयी माहिती आणि त्याविषयीची मतमतांतरेही जाणून घेऊ शकतात.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★